SUPERINTENDENT OF POLICE, NASHIK R.
पोलीस अधीक्षक यांचे कार्यालय, नाशिक ग्रामीण.
पत्ता :- भुजबळ नॉलेज सिटी जवळ, आडगाव नाशिक -४२२००३
दुरध्वनी क्र. ०२५३ - २३०९७०४ फॅक्स क्र. ०२५३-२३०९७०५
E Mail ID :- sp.nashik.r@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# -: सुचनापत्र :-

21 DEC 2022

क्रमांक:पशा/कक्ष-३/मो.प./सुटेभाग खरेदी-दुरुस्ती/१९५/६२५५/२०२२, नाशिक ग्रामीण, दिनांक २१.१२.२०२२.

याद्वारे सर्वांना सुचीत करण्यात येते की, पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण आस्थापनेवरील सर्व शासकीय वाहनांचे सुटेभाग व दुरुस्तीची खालील नमुदप्रमाणेचे कामे करण्यासाठी बाजारातुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत. जे-जे पुरवठादार अशा बाबींचा/सेवांचा पुरवठा करण्यास तयार असतील, त्यांनी त्यांचे दर सिलबंद लिफाफ्यात, दिनांक ३०.१२.२०२२ रोजी १७.०० वा.पावेतो, पोलीस उप-अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, यांचे दालनात सादर करावी.

| अ.क्र. | वाहन सुटेभाग व दुरुस्तीकामाचे स्वरुप |
|---|---|
| १. | वाहनांचे व्हील अलार्न्मेंट व बॅलन्सींग |
| २. | वाहनांचे कुशनिंगचे कामे |
| ३. | वाहनांचे मशिनींगची कामे |
| ४. | वाहनांचे पाटे कॅम्बरींगची कामे |
| ५. | वाहनांचे टायर पंक्चर व फिटींगची कामे |
| ६. | वाहनांचे इंजिनिअरींग वर्कसची कामे |
| ७. | वाहनांचे ए.सी. दुरुस्तीची कामे |
| ८. | वाहनांचे रेडिएटर दुरुस्तीची कामे |
| ९. | दुचाकी वाहनांचे दुरुस्तीची कामे |
| १०. | वाहनांची पी.यु.सी. |
| ११. | फायर इस्टींग्युशन रिफीलींगची कामे |
| १२. | वाहनांची क्लचप्लेट फेसिंगची कामे |
| १३. | टाटा पॅसेंजर वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्तीची कामे |
| १४. | महिंद्रा अॅन्ड महिंद्रा वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामे |
| १५. | टाटा कमर्शियल वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामे |
| १६. | एस एम एल इसुजु वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामे |
| १७. | मारुति सुझुकी वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामे |

| | |
|---|---|
| १८. | आयशर वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामे |
| १९. | टोयोटा वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामे |
| २०. | निसान वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामे |
| २१. | फोर्स वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामे |
| २२. | महिंद्रा कमर्शियल वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामे |
| २३. | बजाज ऑटो दुचाकी वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामे |
| २४. | हिरो दुचाकी वाहनांचे सुटेभाग खरेदी व दुरुस्ती कामे |
| २५. | लुकास व बॉश (मायको) कंपनीचे इलेक्ट्रीक सुटेभाग खरेदीची कामे |
| २६. | बॉश (मायको), टीव्हीएस (लुकास डेल्फी) कंपनीचे एफआयपी (फ्युलपंप) दुरुस्तीकामे |
| २७. | रिमोल्डींग टायर करण्याची कामे |
| २८. | वाहनांना लागणारे सर्व प्रकारचे पेंट खरेदी |
| २९. | वाहनांना लागणाऱ्या सीट कव्हर खरेदी कामे |
| ३०. | वाहनांना लागणारे सीट कुशनिंग मटेरीयल खरेदी कामे |
| ३१. | वाहनांना लागणारी सर्व प्रकारचे इलेक्ट्रीक वायर, बल्ब, हॉर्न साहित्य खरेदी कामे |
| ३२. | सर्व प्रकारचे हार्डवेअर, नट बोल्ट साहित्य खरेदी कामे |
| ३३. | वाहनांना लागणारे सर्व प्रकारचे ऑईल, कुलंट, बॅटरी ॲसिड व बॅटरी वॉटर खरेदी कामे |
| ३४. | वाहनांचे टर्बो चार्जर दुरुस्ती कामे |
| ३५. | वाहनांसाठी लागणारे मॅटीन सेट खरेदी कामे |
| ३६. | वाहनांसाठी करावे लागणारे रेडीयमची कामे |
| ३७. | वाहनांना सिक्वेंशियल दिवे व सायरन बसविण्याचे ब्रॅकेट खरेदीची कामे |
| ३८. | वाहनांना बसविण्यात येणाऱ्या संरक्षण जाळया खरेदीची कामे |

वरील बाबींकरीता स्वतंत्र दरपत्रके मागविण्यात येत असून पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग, नाशिक ग्रामीण यांचेशी संपर्क साधून प्रत्यक्ष कामाचा तपशिल समजुन घ्यावा, त्यानंतर आपले दरपत्रके सादर करावीत.

**<u>पुरवठा व सेवेच्या अटी-शर्ती खालीलप्रमाणे असतील.</u>**

१. कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा अधिकार, तसेच नमुद दरपत्रक प्रक्रीयेतील कोणतीही अट रद्द करण्याचा / शिथील करण्याचा किंवा संपुर्ण प्रक्रीया रद्द करण्याचा अथवा पुढे ढकलण्याचा अधिकार, पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण यांना राहील.
२. मंजुर केलेल्या दरपत्रकाचा कालावधी हा दर स्वीकृत केल्याचे दिनांकापासून १ वर्षाचा राहील. तसेच सदर कालावधीत स्वीकृत केलेले दर कोणत्याही सबबीवर कमी/जास्त करता येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

३. समाधानकारक सेवा न दिल्यास करार कालावधीमध्ये सदर करार केव्हाही रद्द करण्याचा अधिकार, पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण यांनी राखून ठेवला आहे.
४. प्रत्येक निविदाकारास फक्त एक दरपत्रक देण्याची परवानगी असेल.
५. दरपत्रक वास्तव, वस्तुनिष्ठ, बाजार किंमतीनुसार असावेत.
६. पुरवठा केलेले सुटेभाग मुळ प्रतीचे अथवा त्यापेक्षा चांगल्या प्रतीचे राहतील याबाबत खात्री करुन पुरवावे.
७. पुरवठादार/दुरुस्तीदार यांनी संबंधीत वाहन निर्मीती कंपनीचे अधिकृत विक्रेता, पुरवठादार/दुरुस्तीदार असलेबाबतचे कंपनीचे प्रमाणपत्र सादर करावे लागतील.
८. दरपत्रक स्वीकृतीनंतर निविदाकार यांनी सुटेभागांचे MRP दरसूची या कार्यालयास सत्वर सादर करणे बंधनकारक राहील.
९. यशस्वी दरपत्रक हे या कार्यालयाने दरपत्रकासाठीच्या विनंतीमध्ये नमुद केलेल्या गरजांची पुर्तता करणारे सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक असेल.
१०. दरपत्रक सादर करतांना निविदाकार यांनी, त्यांचा शॉप ॲक्ट प्रमाणपत्र (मुंबई दुकाने व संस्था अधिनियमान्वये) व GST क्रमांक सादर करावा. तथापि, GST क्रमांक लागू नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक असलेल्या निविदाकराच्या लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे.
११. दरपत्रक सादर करतांना निविदाकाराने पॅनकार्ड सादर करणे बंधनकारक राहील.
१२. त्रुटी असलेले अथवा खाडाखोड असलेले दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत.
१३. वाहनाचे सुटेभाग, साहित्य विहीत मुदतीत पुरवठा न केल्यास प्रति दिन रु. ५००/- याप्रमाणे दंड आकारण्यात येईल.
१४. देयकावर लागणारे सर्व शासकीय कर, निविदाकार/पुरवठादाराचे देयकातुन वसुल करण्यात येईल.
१५. शासकीय वाहने दुरुस्ती / सुटेभाग पुरवठा करणेबाबतचा ठेका, यशस्वी निविदाकार हे दुसऱ्या कोणत्याही संस्थेस / पुरवठादारास हस्तांतरीत करु शकणार नाही.
१६. यशस्वी निविदारकार यांनी, पोलीस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग, नाशिक ग्रामीण यांचे मार्फतीनेच देयके मंजुरीस्तव सादर करावी.
१७. निविदाकाराने अनुभवाचा दाखला दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.
१८. सुटेभागांचा पुरवठा व दुरुस्तीचे कामकाज इ.करीता कोणत्याही प्रकारचे अग्रीम देय राहणार नाहीत.
१९. निविदाकाराने, खरेदी प्राधिकाऱ्याबरोबर हितसंबंधांचा नसलेबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत हमीपत्र दरपत्रकासोबत जोडावे.
२०. दरपत्रके सुवाच्च हस्ताक्षर अथवा टंकलिखित करावी व दरपत्रकातील अंक हे इंग्रजीत व पुर्ण रुपयात नमुद करावे. दरपत्रक सिलबंद पाकीटात देण्यात यावे.
२१. सदरची दरपत्रके भरुन दिनांक २२.१२.२०२२ ते ३०.१२.२०२२ या कालावधीत कार्यालयीन वेळेत, सिलबंद पाकीटामध्ये, पोलीस उप-अधीक्षक (मुख्यालय), पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण यांचे दालनात सादर करावी.
२२. सदर दरपत्रके पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण कार्यालय येथे दिनांक ०३.०१.२०२३ रोजी १६.०० वाजता खरेदी समिती व सर्व संबंधीत निविदाकार यांचे समक्ष उघडण्यात येतील.

**( शहाजी उमाप )**
पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण.